Estd. 1999
SURYADATTA® EDUCATION FOUNDATION
(Trust Registration No. : MAH/1214/2000 Pune Society Registration No.: F17505 dtd.25/01/2001)
(ISO 9001-2008 Certified Institutes by AQA International, LLC, USA)
Suryadatta Group
Enriching Careers & Enhancing Lives
Regd. Office : 2074, Sadashiv Peth, Vijayanagar Colony, Pune - 30, Maharashtra, INDIA
SGI Campus : Survey No. 342, Patil Nagar, Off Chandani Chowk - Pashan Road, Bavdhan (Bk), Pune - 21
Tel. No. : +91 20- 24330425, 24336000 M. +91 9763266829 Fax No. : 020 - 67901333
Email: support@suryadatta.org, sbc27661@gmail.com Website: www.suryadatta.org
Business School of International Repute
Prof. Dr. Sanjay B. Chordiya - Founder President, BE(Mech), MMS, MBS, Ph.D., PGDIM, PGDMM, PGDBM, PGDMLM, FAIMA,F.I.P.E., F.I.E. & Chartered Engineer

Ref. No. : SEF/ Date :

# सूर्यदत्ता शाळेच्या विद्यार्थ्यांनी कारगिल विजय दिवस केला साजरा

भारतीय सैन्यांनी आपल्याला नेहमीच प्रेरणा दिली आहे, म्हणूनच आमचा उत्साह गगनात मावेनासा झाला जेव्हा आम्हाला कळले कि १७ व्या कारगिल विजय दिवसाच्या निमित्ताने आम्ही तिन्ही दलांच्या संयुक्त प्रशिक्षण संस्था भारतीय संरक्षण अकादमीला भेट देणार आहोत.

खडकवासला तलावाच्या हिरवळीत वसलेले आणि पुण्यापासून २० कि.मी. अंतरावर असलेली ही अकादमी तिच आहे जिथे कारगिल युद्धामध्ये शौर्य व कारकिर्दी दाखवलेल्या आणि वीर चक्र विजेते कॅप्टन मनोज कुमार पांडेय चे सैनिक होण्याचे स्वप्न पूर्ण झाले होते.

एनडीए ची स्थापना झाल्या पासून, इथल्या बऱ्याच माजी विद्यार्थ्यांनी भारताच्या प्रमुख युद्धांमध्ये भाग घेतला आहे. या माजी विद्यार्थ्यांमध्ये तीन परम वीर चक्र विजेते आणि अकरा अशोक चक्र विजेत्यांचे नाव पण समाविष्ट आहे. इतकेच नाहीतर २८ लष्करी अधिकारी यासह तिन्ही दलांचे सध्या कार्यरत असलेले अधिकारी यांचा सुद्धा समावेश आहे. एनडीएला भेट देणे हा एक दुर्मिळ अनुभव होता जिथे नुकतेच १२वी तुन पास झालेल्या लाजाळू व बेशिस्त विद्यार्थ्यांना प्रशिक्षणाच्या सहाय्याने स्मार्ट आणि आत्मविश्वासू बनवले जाते जे कि लष्कराचे अधिकारी होण्याच्या मार्गावर असतात.

इक्वेस्ट्रीअन प्रशिक्षण क्षेत्रात 'स्लिंट वॉरियर्स' आणि 'ब्लॅक वेलणेत ' नावाची घोड्यांची कबर देखील आहे. या देशाला गौरव मिळवून दिल्या बद्दल आम्ही त्यांना श्रद्धांजली वाहून मानवंदना दिली.

भव्य सुदान ब्लॉक इथे एनडीए चे सर्व प्रशासकीय काम सांभाळले जाते. जर का भव्य वास्तुकला आणि सुंदर लॉनस ने तुमच्या मनावर ठसा नाही उमटवला तर स्तंभांवर शहिदांचे कोरलेले नाव नक्कीच उमटवेल. हट ऑफ रिमेम्बरेन्स इथे आम्ही देशासाठी प्राण गमावलेल्या आणि एनडीए चे माजी विद्यार्थी ह्यांना श्रद्धांजली वाहिली.

हवाई दलाचे प्रशिक्षण संघ जिथे विद्यार्थ्यांना लष्करी विमानचालनासाठी आणि सुपर डेमोना विमान उडविण्याकरिता प्रशिक्षण दिले जाते तिथे आम्ही भेट दिली.

सुपर डेमॉन हे ऑस्ट्रियन पद्धतीचे आणि भारतीय बनावटीचे विमान आहे ज्येची गती ही २५० कि.मी/ता आहे. इतर लढाउ विमानांपेक्षा विपरीत या विमानाची चाकं ग्लायडिंग विंग्स लाच जोडलेली असतात. विमानगृहात ठेवलेले विमान हेय एक अद्भुत दृश्य होते.

आम्ही एक ३० मि.नि. फिल्म जी कि विद्यार्थ्यांच्या प्रशिक्षणावर आधारीत आहे ती बघितली. १७०० ची क्षमता असलेल्या भव्य द्वि-मजल्याच्या  सभागृहात विभिन्न व्याख्याने, सादरीकरणे, संगीत-संध्या, वादविवाद, सामान्य ज्ञानाची चाचणी अश्या विविध स्पर्धासह पदवीदान समारंभ ज्येच्यात विद्यार्थ्यांना पदवी दिली जाते असे कार्यक्रम सुद्धा घेतले जातात.

आपल्या देशातील सर्वात मोठे लष्करी संग्रहालय येथे आहे जिथे मौल्यवान संपत्ती जसं की १५व्या आणि १६व्या शतकातल्या डायनॅस्टिक वॉर्स मधील वापरलेल्या स्वोर्ड ऑफ कॅप्टन कॉन्सोल फेर्नांदिझ ऑफ कॉर्डोबा, नीलम नी सजवलेले फलक, अश्मयुगातील शस्त्रे, केनिया चे हस्तिदंताने बनवलेले डिनर गॉन्ग, पाकिस्तानी आणि पोर्तुगीस चे मिळविलेले झंडे आणि उझी च्या सब-मशीन बंदुका आदि, ठेवलेल्या आहेत. पण ज्येनी माझे लक्ष वेधून घेतले ते म्हणजे भारताच्या पहिल्या अंतराळवीर विंग कमांडर राकेश शर्मा यांचा प्रशिक्षण सूट. एनडीए चा शानदार माजी विद्यार्थी म्हणून ओळखले जाणारे ते अवकाश-विज्ञानाचा अभ्यास करू पाहणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी नक्कीच प्रेरणादायी आहेत.

शस्त्र-तंत्रज्ञान पार्क मध्ये फिरताना आम्ही विविध शस्त्र-प्रणाली आणि उपकरणे बघितली जी प्रत्यक्ष युद्धात वापरली जातात.

आम्ही प्रचंड मोठे परेड ग्राउंड पण बघितले जिथे विद्यार्थी परेड चे प्रशिक्षण घेत होते आणि त्येंच्या पायाच्या आवाजाने ग्राउंड दणाणून उठले होते.

लवकरच आम्ही आमची शाळा सूर्यदत्ता नॅशनल स्कूल येथे शांत आणि विचारमग्न होऊन परतलो. या एनडीए ला दिलेल्या भेटीमुळे आम्ही मनात अफाट उत्साह, धैर्य आणि देशभक्ती घेऊन परतलो.
या सैनिकांना त्येंच्या शौर्य आणि धैर्य साठी नम्रपूर्वक सलाम.
जय हिंद !!!

सुर्यदत्ता नॅशनल स्कुलच्या विद्यार्थ्यांनी एनडीएला भेट दिली- सुदान हॉल




सुर्यदत्ता नॅशनल स्कुलच्या विद्यार्थ्यांनी एनडीएला भेट दिली- सुदान हॉल



सुर्यदत्ता नॅशनल स्कुलच्या विद्यार्थ्यांनी एनडीएला भेट दिली - संग्रहालय



सुर्यदत्ता नॅशनल स्कुलच्या विद्यार्थ्यांनी एनडीएला भेट दिली- हबीबुल्लाह हॉल